दही पहिल्या दिवशी विरजलेले दुसऱ्या दिवसापर्यंत खावे. पुढे खाऊ नये. द्विदल, दही ताकाशी मिळून खाऊ नये. हे खाण्यात हिंसेचा दोष लागतो. कारण हे मिश्रपदार्थ मुखात जाताच त्यात लाळेच्या संयोगाने सम्मूर्च्छन जीवांची उत्पत्ती होते. दूध धार काढल्याबरोबर गाळून दोन घटिकांच्या आत तापवावे. दोन घटिकानंतर त्यात संमूर्च्छन त्रसजीवांची उत्पत्ती होते. लोणी हेही ताकातून काढ त्या बरोबर तत्काल त्याचे तूप करावे व ते शोधून भक्षण करावे. तूप, तेल, पाणी वगैरे कातड्याच्या बुदलीत ठेवलेले भक्षण करू नयेत. कारण त्यात ठेवल्याने असंख्यात जीवांची उत्पत्ती होते. बुदली ही पशूंच्या शरीरावरील चामडे आतील मांस काढून त्याला बडवून मातीचा साचा बनवून त्यावर तयार करतात. अशा प्रकारच्या कातड्याने बनविलेल्या भांड्यातील तेल, तूप वगैरे पदार्थ खाणे हे मांस भक्षण केल्याप्रमाणे आहे. याची प्रवृत्ती या देशात मुसलमानांचे राज्य झाल्यापासून सुरु झाली आहे. जर कोठे चर्मस्पर्शाशिवाय तूप तेल मिळत नसेल तर तुपाशिवाय भोजन करावे. फाल्गुन महिन्यानंतर तिळात व शिंघाड्यात पुष्कळ त्रसजीव उत्पन्न होतात म्हणून त्या महिन्यानंतर ते भक्षण करू नयेत.

पाणी दुहेरी वस्त्राने गाळून प्यावे, दुसऱ्याला पण गाळून पाजावे. पशूला देखील गाळूनच पाजावे. अगालित जलाने स्नान, भोजन, वस्त्र धुणे वगैरे कोणतीही क्रिया करू नये. पाण्याविषयी अतिशय काळजी घेतली तरच दया पाळली जाते. भांड्याच्या मुखा पेक्षा तिप्पट लांब व दुहेरी नवे कापड घेऊन ते दुसऱ्या पात्रात गाळावे व गाळणे धुऊन ते विसळलेले अगालित पाणी जेथून आणले असेल तेथे नेऊन टाकावे. पाण्याविषयी आपण इतकी काळजी बाळगली म्हणजे आपण जयकाल जीवांची दया केली असे म्हणता येते गृहस्थाला या मर्यादेबाहेर जास्त सावधानी ठेवता येणार नाही. म्हणून सांडताना, गेताना वरील क्रीया सावधानतेने करावी. गाळलेल्या पाण्याची दोन घटिकांची मर्यादा आहे. त्यानंतर पुन्हा ते उपभोगात आणावयाचे झाल्यास गाळले पाहिजे. तापविलेले पआमी दोन प्रहर म्हणजे सहा तासापर्यंत प्रासुक (शुध्द) असते. उकळी फुटेपर्यंत तापविलेले आठ प्रहरापर्यंत (चोवीस तास) शुध्द असते, पुढे ते निरूपयोगी होते.

कित्येक फळामध्ये त्रसजीवांचा घात होतो. म्हणून ती खाऊ नयेत. जसे बोर हे केवळ किड्यांचे घर आहे. भेंड्यामध्ये पुष्कळ आळ्या उत्पन्न होतात. वांगी, टरबूज, कोहळा, जांभूळ,

आडू (पीचफल), बडवाल, गोल अंजीर, कठूउमर (जंगली उंबर), उंबराचे फल, पीलू (औषधी फल), बटाटे, जामफल (टीडू), अज्ञातफल, किडके फल, चंलितरस, साराफल, शाकभाजी, कंदमूल, आले, सलगम, प्याज (तांदा), लसून, गाजर, किशोऱ्या, कचनार, महुआ, क्षीरवृक्षाचे फल, खिरनी वगैरे, लिंबोळ्या केवडा, केतकी इत्यादिकांचे फुले, यामधील दोष प्रत्येक्ष किंवा शास्त्रावरून समजून येतात. शास्त्रात वनस्पती दोन प्रकारची वर्णिली आहे. एक प्रत्येक वनस्पती व दुसरी साधारण वनस्पती, एका शरीरात एक जीव असणे, यास प्रत्येक वनस्पती म्हणतात व एक शरीर असून ज्यात अनंतानंत जीव असतात त्यास साधारण वनस्पती म्हणतात. साधारण वनस्पती भक्षण करणे यात अनंतानंत जीवांचा घात होतो. म्हणऊन ती खाऊ नये हे योग्य आहे.

ज्या वनस्पतीत रेषा प्रकट झाली नसेल, ज्याची कळी उमलली नसेल, ज्यात पैली (पेर, कांडे) प्रकट झाली नसेल व जी तोडली असता अगदी बरोबर तुटली जाते, वेडीवाकडी तुटत नाही, अथवा जी कापली जात नाही व फुटली जात नाही, ज्यात अजून तंतू प्रगट झाला नाही तिला साधारण वनस्पती म्हणावे. यांच्या असंख्यात प्रदेशात अनंतानंत जीव असतात.

ज्या वनस्पतीत धारा, रेषा, कळी, बेरी वगैरे फुटलेल्या दिसत असती ल तिला प्रत्येक वनस्पती म्हणावे. जी वनस्पती तोडली असता वाकडी तिकडी तुटते, चाकूने काप्यासारखी अगदी सरळ तुटत नाही व ज्यात तार-रेषा प्रगट झाले असतील त्या सर्व प्रत्येक वनस्पती जाणाव्या. कित्येक वनस्पती प्रथमत: साधारण असून अंतर्मुहूर्तात त्याच प्रत्येक होतात व कित्येक साधारणच राहतात. पान, फूल, बी, डहाळी, (कूंपल) कोवळी पाने वगैरे सर्वांची साधारण प्रत्येक ओळखण्याची हीच खूण आहे. पाने जर सारखी विभागली जातील तर त्यांना साधारण म्हणावे. इतर सर्व वृक्ष साधारण नव्हेत. बिडा, कूंपल जर समभंग होत असतील, त्यात रेखा प्रकट झाल्या नसतील तोपर्यंत त्यांना साधारण म्हणता येईल. त्याशिवाय इतर साधारण नाहीत. याप्रमाणे वनस्पतीमध्ये कोणी साधारण कोणी प्रत्येक असतात. अशा वनस्पतीचे भक्षण करण्यात अनेक त्रस जीवांचा घात होतो. जिनधर्म धारण रकरणाऱ्यांनी पापाच्या भीतीमुळे हरितकाय वनस्पतीचा त्याग करावा.

कोणी जिव्हालंपट बनू नये. ज्यांनासर्व तऱ्हेचे हरितकाय त्याग करण्याचे सामर्थ्य नसेल त्यांनी कंदमूलादि अनंतकायाचा तरी यावज्जीव त्याग करावा. पंचोदुंबर फळामध्ये प्रत्यक्ष त्रस जीव भरलेले दिसतात. याचप्रमाणे फल, पुष्प, शाकमात्रातही जीव भरपलेले दिसून येतील. अशा सर्व भाजीपाल्यांचा, दहा-वीस ज्या आपणास योग्य वाटतील त्या ठेवून, त्याग करावा, शिवाय

सर्व वनस्पतिकाय अठ्ठावीस लाख कोटि आहेत, त्यांचा तरी नियम करून आपल्या डोक्यावरील पापाचा बोजा कमी करावा. हरितकायाचे प्रमण करून बाकींचा त्याग करणाऱ्याला कोट्यावधि अभक्ष यांचा दोष टाळता येतो. हरितकायेत कोणतीही पाने भक्षण करण्यायोग्य नाहीत. त्रस जीवांची उत्पत्ती टाळता येईल अशा इतर पुष्कळ पदार्थांचा त्याग करावा. त्याग केल्याशिवाय निरर्गल राहिल्याने असंयमपणाचे आस्त्रव होतात. याकरिता हरितकाय भक्षण करण्यामधअये नियम करणे जरूर आहे हे आपणांस दिसून आलेच असेल.

ज्या अन्नावर बुरसा आला असेल, जे अन्न नासले असेल, ज्यावर निळआ, हिरवा, तांबडा बुरसा आला असेल ते अन्न भक्षण करू नये. त्यात अनंतानंत जीवांचा घात होतो. मोहाला कारण, प्रमादाला उत्पन्न करणारी, ज्ञानाला बिघडविणारी जिव्हा व उपस्थइंद्रियाला विकल करणारी भांग, तंबाखू, (छोंतरा) अम्मल, हुक्का, जरदा वगैरे अभक्षय पदार्थांचे खाणे, पिणे जिनधर्मानुयायी पुरुषाला योग्य नाही. या अमली पदार्थापासून पराधीनपणा प्राप्त होतो. यातून अफू खाणाऱ्या मुष्याला जर एक क्षणभर ती प्राप्त झाली नाही तर त्याला जमिनीवरून पाय उचलणे अशक्य होते. तो न मिळाल्यास जनावरासारखे पाय झाडू लागतो. निर्लज्ज होऊन वाटेल त्याजपाशी मागू लागतो. त्याच्या डोळ्यातून अश्रू येऊ लागतात. अफू मिळाली म्हणजे त्याला धुंदी चढते, जिभेची तृष्णा वाढते. स्वाध्याय, धर्मश्रवण, व्रत, संयम, उपोषण तर होण्याचे नावच नको. त्याची बुध्दी धर्मापासून पराङ्मुख होऊन उत्तम आचरणाचा नाश होतो. सारांश, अफू खाण्याची सवय इतकी वाईट आहे म्हणून त्याचा त्याग करावा.

हुक्का पिणाऱ्याची अवस्था पहा. हुक्क्याच्या मलिनपणाने व दुर्गंधीने गुडगुडीच्या पाण्यात तंबाखू व धुराच्या संयोगनाने जीवांची उत्पत्ती होते. ते पाणी जेथे टाकावे तेथील षट्काय जीवांची हानी होते. सदारचरणी पुरुष हुक्का ओढणाऱ्या मुष्याच्या घरात सदैव विस्तव पेटलेला असतो. हुक्का नीच पुरुषांनी ओढआवा. उत्तम पुरुषांनी ओढणे योग्य नाही. हुक्का पिणाऱ्यांना हाडीवान, सैस, मेणेवाले, भोई वगैरे लोकांची संगती वाडते. उत्तम पुरुषांची सोबत त्याला आवडत नाही. हुक्केचे व्यसन असणार्या मनुष्याला ओढण्याची तलफ झाली असताना ती न मिळाल्यास वर वर्णिलेल्या लोकांकडून चिलीम मागून आणतो. तो ओढल्यावाचून राहात नाही. तो पुढे पुढे या व्यसनाच्या इतका आधीन होतो की, त्याला हुक्का न ओढला तर मोठा रोग उत्पन्न होतो असे वाटते. अथवा पोटात गोळा उठतो अथवा मलावरोध होतो असे वाटते. याप्रमाणे आपल्याच कृतीमुळे अनेक मोठमोठी दु:खे व्यसनी पुरुष ओढून घेतो व यामुळे त्यास व्रते, उपोषणादि उत्तम कार्यावर पाणी सोडावे लागते.

तंबाखू हे महान अशुद्द द्रव्य आहे. हे तोंडात धरून अनेक मलमूत्र विसर्झन करीत असतात. ही बहुतेक नागवेलीच्या पानाबरोबर खआत असतात. प्रसंगी पान न मिळाल्यास ती तशीच तोंडातून चघळल्याशिवाय त्याला चैन पडत नाही. कोणी पुरुष रस्त्यातून मोठा डोलदार पोशाख घालून जात असता तोंडात पान-सुपारीच्या विड्याबरोबर तंबाखू चघळीत पिचकाऱ्या थुंकीत झाण्यात त्याला फार अभिमान वाटतो. त्यावेळी त्याला त्या विड्यावरोबर लावलेला चुना किती दिवसाचा असून त्यात किती घाण असते याची कल्पनाही मनात येत नाही. नीच जातीचे लोक आपले हातपाय न धुता खाजवीत खाजवीत जरदा तयार करणअयाकरिता तंबाखू मळीत असतात. तत्यांना उष्ट्याची ग्लानी नसते. जरदा खाणारे लोक आपल्या घरातील प्रत्येक जागा थुंकून घाण करतात. रस्त्याने जात असता पशू देखील आपले तोंड हलवीत नाहीत. परंतु हे व्यसनी पुरुष पशूपेक्षा देखील कनिष्ठ बनून रस्त्याने तंबाखू खात जात असतात. त्यांच्या तोंडाची दुर्गंधी येते. त्यांच्या तंबाखूची पिचकारी जेथे पडेल तेथील माशा, डास, किडे, मुंग्या वगैरे मोठमोठे त्रस जीव मरण पावतात व पंचस्थावरांचा घात होतो. व्रत, संयम, उपवास, स्वाध्याय, जपजाप्य, शुभभावना अशा पुरुषाला घडत नाहीत. जर्दा करणाऱ्यांची बुध्दी आत्महित करणअयाकडे वळत नाही. ते संयम धारण करण्यास अयोग्य होतात. त्यांच्या ठिकाणी दया,क्षमा, शील, संतोष इंद्रियविजयं वगैरे उत्तम गुण कधीही उत्पन्न होत नाहीत. ते नेहमी पापक्रिया, मायाचार, कपटक्रिया यामध्येच तल्लीन असतात. त्यांची अनेक व्यसनाकडे प्रवृत्ती होते. तंबाखू खाणाऱ्याला दुसऱ्यापुढे हात पसरण्याची लाज वाटत नाही. तो नीच पुरुषापाशी देखील याचना करून पण तंबाखू खातो. मद्यमांस खाणारे ज्यावेळी मद्य पीत असतात व हुक्का पीत असतात त्यावेळी देखील त्याजपासून जरदा अथवा विडी मागून ओढण्यास त्यास शरम वाटत नाही. जर्दा खाणाऱ्या पुष्कळ माणसांना निरखून पाहता त्यातून एकालाही परमार्थबुद्धी अथवा परलोकासाठी निर्मल आचरणाची बुद्धी होत नाही. या तंबाखूच्या भक्षणापासून हीनाचाराची वृद्धी होते. व्यसनी पुरुषाची अशी स्थिती`होते की नाही याबद्दल तुम्ही आपल्या मनात विचार करून पहा. जर याचा अनुभव तुमच्या मनात वाटला तर जरदा किंवा तंबाखू खाण्याचा त्याग करा. तंबाखूचे व्यसन असणाऱ्याला जर एक दिवस तंबाखू नसली तर तळमळ होते, पोटात दु:खू लागते व अनेक रोग उत्पन्न होतात. सारांश, तंबाखू खाणे म्हणजे अनेक प्रकारच्या मोठमोठ्या रोगाला आमंत्रण करणे आहे, याकरिता याचा त्याग करावा.

भांग पिणे हे पण आपल्या मोठेपणाचा नाश करणारे आहे. भंगड मनुष्याचा दर्जा कमी होतो, त्याची जिव्हेंद्रियाची लंपटता वाढत जाते, त्याची इंद्रिये शिथिल होतात, प्रमाद उत्पन्न

होतो. पुष्कळ वेळ झोप घ्यावी, पुष्कळ गोड पदार्थ भक्षण करावे, अशी इच्छा उत्पन्न होते. तो पापी इंद्रियांच्या विषयांचे स्वाधीन होतो. त्याचे ज्ञान शिथिल होते. तो वहिमी बनतो. भांग पिणाऱ्या मनुष्याला गोड भोजनाची अतिशय इच्छा होते व ते मिळाले म्हणजे आपण सुखी झालो असे वाटते. त्याला आत्मज्ञान अथवा धर्माचे ज्ञान मुळीच असत नाही. बाह्य आचरणही त्याचे भ्रष्ट होते. भांगमध्ये हजारो त्रस जीव उत्पन्न होतात. पावसाळ्यात त्यात अपरिमित त्रस जीवांची उत्पत्ती होते. भंगड लोक तयार केलेली भांग न गाळता तशीच घोटल्याबरोबर पितात.

याचप्रमाणे अफू खाणे, हेही शरीराला अपायकारक आहे. त्यामुळे शरीराचा आकार बिघडून जातो व सदाचार नाहीसा होतो असा नियम आहे. नशा (धुंदी) सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्राचा घात करणार आहे. हे सर्व अंमली पदार्थ अनर्थदंडात येतात व व्यसनात मोडतात व अभक्ष्यामध्येही यांचा अंतर्भाव आहे. याकरिता ज्याला मनुष्यजन्म, जिनधर्म व उत्तमकुल प्राप्त झाले आहे व त्याची सफलता करावी असे वाटत असेल त्याने वर वर्णन केलेल्या व्यसनांचा व नशा येणाऱ्या अम्मली पदार्थाचा त्याग करावा.

रात्री भोजन करणाऱ्याला प्रथमत: यत्नाचारपूर्वक क्रिया करता येत नाहीत व त्यामुळे त्याला जीवहिंसा घडतेच. रात्री किडे, मुंग्या, माशा, चिलटे, मुंगळे वगैरे जीव अन्नात येऊन पडतात. दिवा लावून भोजन करू म्हटले तर दिव्याच्या संयोगाने दूरदूरचे जीव येऊन अन्नावर पडतात, दुसरे असे की, निधर्मी पुरुषांनी जर रात्री जेवण्याचा एप्रघात पाडला तर पुढच्या पिढीचा सन्मार्ग बिघडविल्यासारखे होणार आहे. जैनांनीही जर इतर लोकाप्रमाणे रात्रौ चूल पेटविणे स्वयंपाकाची जागा सारवून अथवा धुवून साफ करणे वगैरे हिंसा होणारी कर्मे केली तर त्या, कृत्यापासून प्रत्यही अविवार्य हिंसा उत्पन्न होऊन अनेक जीवांचा घात होत राहील. मग अशा प्रकारची कर्मे करणाऱ्याला जैन नाव तरी कसे शोभेल(व त्याजकडून जैन धर्म तरी कसा पाळला जाईल(यावर कोणी म्हणेल की, आम्ही रात्री आरंभ करणार नाही पण कोरडे फराळ, लाडू, पेढे, बर्फी, जिलेबी, पोहे, दूध वगैरे भक्षण करू. यात आरंभ होत नाही ना(याचे समाधान असे, दिवसा भोजन करावयाचे सोडून रात्रौ भोजन करणाऱ्याच्या मनात तीव्र राग उत्पन्न होतो व भोजनाविषयी इतकी उत्कट इच्छा उत्पन्न होणे हीच महान हिंसा आहे. जसे अन्नाच्या घासाविषयी प्रीती व मांसाच्या घासाविषयी प्रीती या दोन्ही जरी प्रीतीच खऱ्या पण त्या समान नव्हेत. याचप्रमाणे दिवसा भोजनाचा अनुराग हा रात्री भोजनाच्या अनुरागासारखा नाही. रात्री भोजन करणाऱ्याला पशूप्रमाणे हिंसा-अहिंसेचा विचार राहात नाही. त्याला व्रत तपश्चरण होऊ शकत नाही. अनादि कालापासून विदेहक्षेत्रामध्ये व भतक्षेत्रात चौथ्या कालापासू नजैन दिवसाच भोजन करीत आले आहेत. दिवसातून एक वेळ किंवा फार तर दोन वेळा जेवण्याचा

त्यांचा क्रम चालत आलेला आहे. ते रात्रौ भोजन कधीही करत नसत. असे असून आता जर ते रात्री भोजन करू लागले, रात्री चूल पेटविण्याचा आरंभ करू लागले, जमीन सारवू लागले, रात्री पाणी सांडू लागले व जागा झाडून कढू लागले तर त्यांना बोजन करण्यात शाकभाजी तयार करण्यात, पुरुषाला जेवू घालण्यात, मागाहून बायका-पोरे, गडी-माणसे जेवण्यात, धुण्यात, सारवण्यात, झाडण्यात व भांडी स्वच्छ करण्यात दोन प्रहर रात्र उलटून जाईल. या सर्व क्रिया करण्यात अनेक जीवांचा संहार होईल. अशा स्थितीत जैनांनी यत्नाचारपूर्वक क्रिया करावी म्हणून आचार्यांनी सांगितलेले व्यर्थ झाले. रात्रौ क्रिया करण्यात किडे, मुंग्या, मुंगळे वगैरे ताटात येऊन पडतात, चुलीत पडतात, शाकभाजीत पडतात व पाणी भरून ठेवलेल्या भांड्यातही पडतात. दिव्याच्या अथवा चुलीतील विस्तवाच्या निमित्ताने माशा, मच्छर, चिलटे, पतंग वगैरे जीवांचा दररोज होम होऊ लागतो. दिवसाही आरंभ व रात्रीही घोर आरंभ, या योगाने सतत पापक्रिया घडत राहते व त्याच्या उदयामुळे कुटुंबातील सर्व जीवांवर विविध संकटे प्राप्त होतात. रात्री देखील ज्याला मोठमोठ्या धंद्या-रोजगारापासून क्षणभर सुद्धा विश्रांती मिळत नाही, त्याला धर्मसेवन, शास्त्रपठण, तत्त्वचर्मा, शंका-समाधान, सामायिक, जपजाप्य, शुभध्यान वगैरे क्रिया कशा साधणार(या सर्व कारणाकरिता जिनेंद्रामार्गाला अनुसरून वागणारी माणसे रात्री भोजन कधीही करीत नाहीत अशी सर्व इतर लोकात प्रसिद्धीही आहे. अशा प्रकारची आपली उत्त्म परंपरा, कीर्ती व भोजनाची शुद्धता सोडून कोणी क्षुधापीडित होऊन रात्री दुध, पेढे बर्फी वगैरे पदार्थ फराळ म्हणून अथवा औषध पाणी घेईल तर त्यने आपल्या उत्तम जैनपणाला, उत्तम आचाराला, उत्तम धर्माला तिलांजली दिली असे म्णावे. तो सन्मार्गापासून भ्रष्ट व उन्मत्त आहे असे समजावे. त्याच्या बाह्य अभ्यंतर सर्व क्रिया अधर्माकड़े प्रवृत्ती करविणाऱ्या आहेत असे समजावे.

खर्या जैनाने रात्री तयार केले अन्न दिवसा भक्षण करू नये. याचप्रमाणे त्याने मिथ्याधर्म धारण करणाऱ्या मांसभक्षी लोकांबरोबर भोजन करू नये. नीच जातीशी मैत्री ठेवू नये. देवतेला अर्पण केलेले अन्न भक्षण करू नये. हस्तिदंताचे चुडे व लोकरीच्या वस्त्र नेसून तयार केलेले अन्न ग्रहण करू नये. मांसभक्षण करणाऱ्याच्या घरी आपल्या स्वत: स्वयंपाक करून जेवू नये, नीच जातीच्या घरी पण जेवू नये. अताराच्या घराचा अर्क, माजूम, सरबत व इतर कोणतेही पदार्थ भक्षण करू नयेत.

जलचर, स्थलचर, नभश्चर पंचेंद्रियादिक जीवांच्या मांसाचेही अर्क कढते जातात. पुष्कळ प्रकारची दारू बनवून त्याला अर्क असे नांव दिलेले असते. पुष्कळ जीवांच्या अंड्यातील रसाने पण अनेक बाटल्या भरलेल्या असतात. म्हणून कोणतेही अर्क घेऊ नयेत. अतार लोक

मध, शरबत, मुरब्बा, माजूम, रसायने व अनेक जीवांची इंद्रिये, जीभ, काळीज व शुष्कमांस पण विकत असतात असा नीच पुरुषांच्या येथील कोणतीही वस्तू उत्तम कुलात उत्पन्न झालेल्या माणसाची बुद्धी भ्रष्ट करते. म्लेच्छांनी हिंदुस्थानातील सर्व लोकास आपले उच्छिष्ट सेवन करवून भ्रष्ट करण्याकरिताच की काय ही दुकाने चालविली असावीत असे वाटते. कोट्यावधी कसायांच्या दुकानाइतके एका अताराचे (निषिद्ध औषधे विकणाऱ्याचे) दुकान आहे असे समजावे.

या देशातील राजे लोकांनी हिंदु धर्माच्या रक्षणाकरिता सवंत् १८२२ पर्यंत अताराची दुकाने घालून दिली नाहीत. पण पुढे कालवशात् पापप्रवृत्ती फैलावत चालली. आता तर उत्तम कुलातील लोक पण त्यांच्याकडून अर्क, इंजेक्शन व औषधादिक घेऊन खाऊ लागले आहेत. उच्च लोक म्लेंछांचे उच्छिष्ट व मांस, मदिरा भक्षण करू लागले, आता ब्राह्मणपण, वैश्यपणा, महाजनत्व कोठे राहिले(सर्व कुले भ्रष्ट झाली व या अभक्ष्य भक्षणाच्या प्रभावाने लोकांची बुद्धी सत्यधर्मपराङ्मुख बनली. डॉक्टरांच्या औषधानेच रोग नाहीसा होतो असा तरी नियम कोठे आहे(यांची वाईट औषधे पीत असूनही लोक धर्मभ्रष्ट होऊन मरण पावतात असे दिसून येते. ज्याला दुर्गतीचा बंध झाला असेल त्यालाच त्यांच्या औषधापासून आराम झाला आहे असे समजावे.

राजा अरविंदाला दाहज्वर झाला असता अनेक उपाय केले असताही तो नाहीसा झाला नाही. अखेर त्याच्या राजवाड्याच्या छतावर लढणाऱ्या पालींच्या शरीरातील रक्ताचा थेंब शरीरावर पडला त्यावेळीच त्याला समाधान वाटले. तेव्हा त्या दुष्टाने आपल्या मुलास सांगितले की, मला रक्ताची एक विहीर भरून द्या म्हणजे मी त्यात क्रीडा करीन व त्या योगाने माझा सर्व ज्वर नाहीसा होईल. तेव्हा त्याच्या मुलांनी पापाला भिऊन लाखेच्या रंगाने एक विहीर भरून दिली राजाला विहीर पाहून फार संतोष झाला व तीत तो दररोज क्रीडा करू लागला. जेव्हा मुलाने कपटबुद्धीने आपणास रक्ताची म्हणून लाखेच्या रसाची विहीर भरून दिली असे राजाला समजले, त्यावेळी त्याला अतिशय क्रोध आला व आपल्या हाती सुरी घेऊन मुलाचा वध करण्यास तो पळत निघाला असता रस्त्यात पडला व आपल्या हातातील सुरीच्या घावाने मरण पावून नरकास गेला. याचप्रमाणे ज्याची दुर्गती व्हावयाची असेल त्याला अभक्ष्य औषधापासून आराम वाटेल व त्याचीच प्रवृत्ती ते औषध घेण्याची होईल. याकरिता प्राण गेला तरी बेहत्तेर(पण सहा महिन्याच्या बालकाला देखील अभक्ष्य औषध देणे योग्य नाही. एकदा धर्मविघात झाला म्हणजे अनंतकाल गेला तरी पुन: धर्म प्राप्त होणार नाही. याकरिता जिनधर्म धारण करणाऱ्यांनी आपल्या शरीराचे शतश: तुकडे तुकडे झाले तरी अभक्ष्य करणे योग्य नाही.

बाजारातील दुकानाचे पीठ (चून) कधीही भक्षण करू नये. कारण दुकानात लोक ते पीठ चांभार, खाटीक वगैरे लोकांककडून दळवितात शिवाय ते तशाच माणसांकडे तयार केलेलेही मिळते. दुकानात विकत घेतात त्यामध्ये दीर्घकाल राहिल्याने अनंत जीव उत्पन्न होतात. याचप्रमाणे अतिशय नासलेले व किडके देखील अन्न विकत घेऊन दुकानदार दळवीत असतात. दुकानदाराकडून हिंसक व इतर लोक ते नेत असतात आपले हात त्यात घालतात. कधीकधी लग्नकार्यात नेलेले पीठ उरल्याने ते दुकानदारास परत विकतात. दुकानदार ते पुन: पिठात मिळवून विकतात. म्हणून ते खाणे योग्य नाही.

धर्मशाळेतील अथवा दुकानदारांच्या येथील भांडीकुंडी पितळेची, कांशीची व तांब्या लोखंडाची स्वयंपाक - जेवणाला घेऊ नये. कारण दुकानदार लोक भाड्याच्या आशेने कोणाही मांसभक्षी अथवा दुराची लोकांना ती देत असतात. ज्याला आपले आचरण निर्मल ठेवावयाचे असेल त्याने दोन-चार भांडी प्रवासात नेहमी आपल्याबरोबर ठेवावी व जेथे जाणे पडेल तेथे पैसा अधिक देऊन पीठ ताजे तयार करवून घ्यावे. जर दळण्याचे साधन कोठे उपलब्ध नसले तरी खिचडी अथवा गव्हाची खीर करून खावी.

बाजारची मेवामिठाई पण भक्षण करू नये. त्यात असलेल्या तूप-साखरेला काही मर्यादाच नसते. लोभी व निंद्य कर्म करणाऱ्याला आचरणाची मर्यादा राहात नाही. हे हलवाई मैदा भिजवून सडवितात. त्यामुळे तो आंबट होतो. त्यात अनंत जीव उत्पन्न होतात. त्याची जिलेबी केली जाते. या वस्तू भक्षण करण्यास योग्य नाहीत.

दह्यात साख वगैरे मिळवून पुष्कळ वेळ ठेवू नये, त्याची दोन मुहूर्ताची मर्यादा आहे. त्यानंतर खाऊ नये. आपल्या भाऊबंद आप्तमित्राबरोबर एका ताटात बसून जेवू नये. कुत्रा, मांजर, मनुष्य वगैरे कोणाचेही उच्छिष्ट भक्षण करू नये. गाई, बैल, म्हैस वगैरे पशूंच्या उष्ट्या पाण्याने स्नान करू नये. मग ते पाणी पिण्याचे तर लांब राहो. अन्नाची, साखरेची, लापशीची बनविलेली मनुष्यतिर्यंचांची आकृती भक्षण करू नये. देवदेवी, व्यंतर, क्षेत्रपाल वगैरेच्या पूजेच्या संकल्पाने तयार केलेले अन्न ग्रहण करू नये. मांसभक्षण करणाऱ्याच्या पात्रात भोजन करू नये. आपली भांडी मांसभक्षण करणाऱ्याला देऊ नये. न्हाव्याच्या पात्रातील पाण्याने श्मश्रु करवू नये. रजस्वला स्त्रीने स्पर्श केलेले भांडे जेवण्यास घेऊ नये, विकार उत्पन्न होतील अशी वस्त्राभरणे अनुपसेव्य जाणून ग्रहण करू नये. उत्तम कुलामधील पुरूषास योग्य नव्हेत अशी वेश्येची अथवा विटपुरुषाची वापरण्याची, वस्त्रे, शिपाई अथवा इतर म्लेच्छ लोकांनी घालण्याचे पोषाख, स्वामी, योगी, फकीर, भांड वगैरे लोकांचे पेहराव परिणाम बिघडविणारे आहेत.

त्यापासून आपणास व इतरास विकार उत्पन्न होतात. म्हणून अशी वस्त्रप्रावरणे न वापरता आपल्या पदवीस योग्य व जगात संभावितपणाला शोभणारी अशीच वस्त्रप्रावरणे वापरणे योग्य आहे. सारांश हा की, संसार-परिभ्रमणाला कारण पंचेंद्रियाचे विषयावरील लालसा ही नसावी. त्यातही जिव्हाइंद्रिय व उपस्थइंद्रिय या दोहोंची लालसा इहपरलोकाला बिघडवविणारी आहे. या दोन इंद्रियांची लालसा ज्याला अधिक आहे तो संसारात मनुष्यजन्मात असूनही पशूसारखा आहे, कारण पशू याच दोन इंद्रियांच्या लालसेने पस्पर भांडून मरण पावतात. मनुष्य जन्मातही कलह करणे, मारणे, मरणे, निर्लज्ज होणे, उच्छिष्ट भक्षण करणे, दीन भाषण करणे, दान घेणे, अभक्षय भक्षण करणे, इत्यादिक सर्व नीच कर्माठायी प्रवृत्ती रसनेद्रियांच्या लालसेनेच होत असते. विचार करा. भोगभूमीतील व देवलोकातील नानाप्रकारच्या बोगांनी जर कधी तृप्ती झाली नाही तर आता यत्किंचित जिव्हेचा स्पर्शमात्र स्वाद फारच थोडा वेळ टिकणारा आहे, यापासून तृप्ती कशी होईल(हा स्वाद घास गिळल्यानंतर राहात नाही व पहिल्यांदाही नसतो. अशा प्रकारच्या तृष्णेला वाढ विणाऱ्या आहारातील लुब्धतेचा त्याग करावा. इंद्रियावर नियंत्रण ठेवून सरस, नीरस भोजन जसे भाग्याने प्राप्त होईल त्यात संतोष धारण करावा. जे अभक्ष्याचा त्याग करतात व फक्त धर्मप्राप्तीसाठी शरीराचे रक्षण व्हावे याच हेतूने भोजन करतात ते गर्व पापांचा त्याग केल्याने देवलोकाला पात्र होतात.

ज्याला भोगोपभोगाचे प्रमाण करावयाचे असेल त्याने अगोदर आपले परिणाम दृढ राहतील किंवा नाही याचा पूर्ण विचार करावा. आपल्यातील रागद्वेषाचा अंस इतका कमी झाला आहे, याहून जास्त घटण्याचा सध्या संभव नाही, तसेच आपले सामर्थ्य अमुक प्रारचा संयोग, दु:ख वियोग, प्राप्त झाले असताना सहन करण्याइतके आहे यापेक्षा अधिक दु:ख सहन करणारे आहे की नाही(या सर्व गोष्टींचा विचार करून व्रत घ्यावे. देशाची परिस्थिति आपल्या निर्वाहाला योग्य अशी आहे किंवा नाही(काल वेळ अनुकूल आहे की नाही(आपली अवस्था व्रत धारण करण्यायोग्य आहे की नाही(आपणाला कोणी प्रसंगी सहाय होण्यासारखे आहे काय(आपले व्रत कोणी बिघडविण्यास कारण होईल काय(याचाही विचार करावा. शरीर निरोगी आहे काय(शुद्ध आहार मिळेल किंवा नाही(भोजन वगैरे आपल्या स्वाधीन आहे किंवा पराधीन आहे(अशा प्रकारचे व्रत करण्यापासून अथवा अमुक प्रकारचा त्याग केल्यापासून आपल्या स्त्री-पुत्र धनी वगैरे लोकांना दु:ख होईल की काय(आपण स्वतंत्र आहोत किंवा परतंत्र आहोत(या ही पण गोष्टीचा विचार करून ज्यायोगे आपले परिणाम निर्मल राहून व्रत सांभाळले जाईल असाच मर्यादित कालापुरता नियमरूप त्याग करावा अथवा यमरूप म्हणजे यावज्जीव त्याग करावा.

कित्येक पदार्थ यावज्जीव त्याग करण्यासारखे आहेत. जसे-ज्यात त्रस जीवांचा उघड

उघड घात होत असेल, अनंत जीवांचा नाश होऊन आपल्या कुलात ते पदार्थ सेवन करण्यायोग् नसतील, ज्यातून मद उत्पन्न होत असेल, मद्य, मांस मध, लोणी या चार महाविकृती व रात्रिभोजन, द्यूतक्रीडादि सत्पव्यसने, कोणीही न दिलेल्या परद्रव्यांचे ग्रहण, त्रसहिंसा, स्थूल असत्य, अन्याय्य परिग्रह, अगालित पाणी आणि अनर्थदंड हे यावज्जीव त्याग करण्यायोग्य आहेत. यांचा नियम करता येत नाही. या सर्व क्रियांपासून सदैव पापबंध होतो. याचा त्याग केला म्हणून शरीराला कोणताही त्रास होईल असे नाही, किंवा मोठे संकट प्राप्त होते अशातलाही भाग नाही. याचा त्याग करण्याचसाठी धनाची जरूरी लागत नाही. मोठी शक्ती अंगात असली पाहिजे असेही नाही. यजमान अथवा स्त्री, मित्र, पुत्र, कुटुंबादिकांच्या सहाय्याचीही अपेक्षा लागत नाही. यांचा त्याग करण्याकरिता कोणाचा सल्ला घ्यावा लागत नाही. यांचा त्याग करण्यात शीत, उष्ण, क्षुधा, तृषा वगैरेची बाधा, पीडा सोसावी लागत नाही. हे सर्व आपल्या स्वाधीन ओ. यांचा त्याग करण्यापासून परिणाम शुद्ध होऊन मनाला आनंद होतो. याकरिता अशी दुर्लभ सामग्री प्राप्त झाली असता भोगोपभोगांचे प्रमाण बांधणे हे श्रेष्ठतम कर्तव्य आहे.

प्रबल कर्माच्या उदयाने मनुष्य प्राण्याला कदाचित परदेशात पराधीन होऊन राहण्याचा प्रसंग आला, भयंकर रोग प्राप्त झाल्याने पराधीन व्हावे लागले. म्हातारपण प्राप्त झाल्याने उठण्या बसण्याची शक्ती कमी झाली, पुत्र, मित्र, बंधुवर्ग यापैकी कोणाचेही सहाय्य न मिळाले, डोले आंधळे झाले, कान बहिले झाले, फार दिवस लांबणारा रोग येऊन प्राप्त झाला, कैदखान्यात दुष्टाच्या स्वाधीन होऊन राहावे लागले, दुष्ट लोकांनी शुद्ध आहार बिघडून टाकला व जबरदस्तीने आपल्याबरोबर जेवू घातले, तरी अंतरगात त्याने व्रतसंयमाचे परिणाम सोडू नयेत. बाह्यत: अशा संकट प्रसंगी पंचनमस्कार - मंत्राचा जप चालू करावा. म्हणजे तो या मंत्राच्या ध्यानप्रभावाने शुद्ध होतो. कारण बाह्य शरीरादिक पवित्र अथवा अपवित्र असो, ते मलमूत्र, रक्ताने भरलेले असो, अशाही स्थितीला न जुमानता त्जो मनुष्य परमात्म्याचे एकसारखे स्मरण करीत असतो तो बाह्यत: व अंतरंग दोनही बाजूंनी पवित्रच आहे असे समजावे. कारण शरीर हे सात धूत, मलमूत्रानी भरलेले अनेक रोगांचे घर आहे, हे एका क्षणात कुष्ठरोगाने व्यापून जाते, हजारो फोड उत्पन्न होतात, त्यातून मलमूत्र, रक्त वाहू लागते, अशा अवस्थेत व्यवहारशुद्धी कशी राहावी(व निर्धन एकट्या पुरुषाला सहाय्य तरी कोण होणार(याकरिता धर्मवान पुरुषांनी अशुभ कर्माच्या उदयाने प्राप्त होणाऱ्या संकटाला व रोगाला धैर्य धारण करून तोंड द्यावे. घाबरून दु:ख करीत बसू नये. अशुभ कर्माचा उदय ही एक प्रकारची निर्जरा आहे असे समजून अंतरंगात वीतराग भावाने संसारदेहभोगाचे स्वरूप चिंतन करावे. द्वादशभावनांच्या चिंतनाने कर्मांच्या उदयाहून आत्मस्वरूप वेगळे आहे अशी जीणीव होते आणि आत्म हा ज्ञाता

द्रष्टा शुद्ध आहे असे समजू लागते. राग, द्वेष, हर्ष विषाद, ग्लानी, भय, लोभ, ममता वगैरे आत्म्याचे मल धुऊन टाकून आपणास शुद्ध मानावे म्हणजे त्याला खरी शुद्धता प्राप्त होते.

भोगोपभोग परिमाण व्रताचे दोन भेद

नियमो यमश्च विहितौ द्वेधा भोगोपभोगसंहारे ।

नियमः परिमितकालो यावज्जीवं यमोध्रियते ।। ८७ ।।

अन्वयार्थ - (भोगोपभोगसंहारे) भगवंतांनी भोग आणि उपभोग कमी करण्याकरिता (नियमःयमःच द्वेधा विहितौ) यम आणि नियम अशा दोन प्रकारचे भोगोपभोग परिमाण व्रत सांगितले आहे. त्यातून (परिमितकालः नियमः) कालाची मर्यादा बांधून त्याग करणे याला नियम व (यावज्जीवं यमः ध्रियते) शरीरात प्राण आहे तोपर्यंत त्याग करणे याला यम असे म्हटले आहे.

भावार्थ - ज्यांचा एक वेळ उपभोग घेता येतो, अशा आहारादिक पदार्थांना भोग म्हणावे. ज्यांचा वारंवार भोग घेता येतो अशा वस्त्राभरणादिकांना उपभोग म्हणावे. य भोगोपभोगांचे यम आणि नियम असे दोन भेद आहेत. त्यातून ज्या भोगोपभोगाचे एक मुहूर्त, एक प्रहर, दोन प्रहर, एक दिवस, दोन दिवस, पाच , दहा, पंधरा दिवस, एक, दोन चार, सहा महिने, एक वर्ष दोन वर्षे याप्रमाणे कालाची मर्यादा करून त्याग करणे त्याला नियमप्रमाण म्हणतात. जी वस्तू आपल्या नित्य उपभोगाची असून शुद्ध असेल तिची मर्यादा बांधूनच नियमरूप त्याग करावा. पण जी वस्तू आपल्या उपयोगाची नाही व परिणामहि बिघडविणारी असून सदोष असेल तिचा यावज्जीव यमप्रमाणरूप त्याग करावा हे योग्य आहे.

या भोगोपभोगप्रमाण व्रतापासून अनेक प्रकारच्या पापांचे आस्रव येण्याचे बंद होते व इंद्रिये वश होतात. रागभाव अतिमंद होतो, व्यवहार शुद्ध होतो, मन वश होते, व्यवहार व परमार्थ दोन्ही निर्मल होतात. यामुळे हे व्रत आत्म्याचे हित करणारे आहे असे होते. विरुद्ध भोग असतील ते तर सोडावेच पण जे अविरुद्ध असतील ते पण आपले शक्तिप्रमाण, देश काल पाहून काही दिवस सोडावले. रात्रीची मर्यादा करून त्यातूनह पुनः एक घटका, दोन घटका, चार घटकांची मर्यादा करून सोडीत गेल्याने कर्माची निर्जरा होते.याच नियमाचे स्वरूप

भोजनवाहनशयनस्नानपवित्राङ्गरागकुसुमेषु ।

ताम्बूलवसनभूषणमन्मथसंगीतगीतेषु ।। ८८ ।।

अद्य दिवा रजनी वा पक्षो मासस्तथर्तुरयनं वा।

इति कालपरिच्छित्त्या प्रत्याख्यानं भवेन्नियमः।। ८९।।

अन्वयार्थ - (भोजन-वाहन-शयन-स्नान-पवित्र-अंगराग-कुसुमेषु) भोजन-वाहन-शयन-स्नान-पवित्र-अंगराग-कुसुम इत्यादि भोगपदार्थांविषयी (तांबूल-वसन-भूषण-मन्मथ-संगीत-गीतेषु) विडा-वस्त्र-कामसेवन-संगीत-गीत इत्यादि उपभोग पदार्थांविषयी (अद्य) आज एक घटका एक प्रहर, एक मुहूर्त (दिवा) दिवस (रजनी वा) अथवा रात्र (पक्षः) पंधरवाडा (मासः) एक महिना (तथा) त्याचप्रमाणे (ऋतु) दोन महिने (अयनं वा) सहा महिने या प्रमाणे (कालपरिच्छित्त्या) कालाचे प्रमाण बांधून (प्रत्याख्यानं) त्याग करणे यास (नियमः भवेत्) नियम म्हणतात. याप्रमाणे भोगोपभोगपरिमाण व्रताचे वर्ण करून पुढे या व्रताचे अतिचार सांगतात.

भावार्थ - भोगोपभोगप्रमाण व्रतामध्ये दररोज नियम करीत जावे. मी आज एकवेळ, दोन वेळ, तीन वेळ अथवा चार वेळ आहार घेऊन. याहून अधिक वेळ गेणार नाही किंवा आज सबंध दिवसात अमुक जातीचे अन्न, इतके रस व इतके प्रकार भक्षण करीन, अधिक प्रकार, भक्षण करणार नाही. वाहन म्हणजे हत्ती, घोडा, उंट, पालखी, रथ, गाडी, नांव जहाज यांचे प्रमाण बांधावे, पलंग, बाज वगैरेवर शयन करण्याचा नियम करावा. मी पलंगावर शयन करीन अथवा जमिनीवर निजेन, आज एक किंवा दोन वेळा स्नान करीन अथवा करणार नाही. पवित्र असा अंगराग म्हणजे केशर, चंदन, कर्पूराची उटी लावीन किंवा लावणार नाही. फुले किंवा फुलांची माळा, दागदागिने वगैरे परिधान करीन अथवा करणार नाही. विडा (तांबूल), वेलदोडे, लवंग, सुपारी वगैरे खाईन किंवा खाणार नाही, वस्त्राचे प्रमाण म्हणजे आज इतके वस्त्रे वापरीन, अधिक वापरणार नाही. कामसेवन करण्याचा, नाच पाहण्याचा, गाणी गाण्याचा, वेश्यागीत करविण्याचा, सिंहासन, खुची, चौरंगावर वगैरे बसण्याचा नियम करावा. याप्रमाणे नेहमी आपल्या उपयोगात येणाऱ्या भोगोपभोग पदार्थांच्या नियम करणाऱ्याला भोजनपान करीत असूनही संवत घडून येतो.

भोगोपभोग व्रताचे अतिचार

विषयविषोत(नुपेक्षानुस्मृतिरतिलौल्यमतितृषानुभवौ।

भोगोपभोगपरिमाव्यतिक्रमाः पंच कथ्यन्ते।। ९०।।

अन्वयार्थ - (विषयविषत:) विषय हे संताप वाढविणारे आहेत, यांच्या निमित्ताने मरण देखील प्राप्त होते. म्हणून पंचेन्द्रियांच्या विषयाला विष म्हटले आहे. त्यापासून (अनुपेक्षा) आपल्या परिणामातील राग कमी न होणे याला अनुपेक्षा अतिचार म्हणतात. (अनुस्मृति:) पूर्वी जे विषय भोगले असतील त्यांचे वारंवार स्मरण करणे यास अनुस्मृति अतिचार म्हणतात. (अतिलौल्यं) विषय भोगीत असताना अतिशय अधाशीपणाने अथवा आसक्तीने भोगणे याला अतिलौल्य अतिचार म्हणतात. (अतितृषानुभवौ) भविष्यकाली विषय भोगण्याची अतिशय इच्छा लागून राहणे याला अतितृष्णा अतिचार आणि विषय भोगीत नसूनही ((जणू काय प्रत्यक्ष आपण वषयोपभोग घेत आहोत((असे परिणाम होणे यास अनुभवातिचार म्हणतात. याप्रमाणे (भोगोपभोगपरिमाव्यतिक्रमा: पंच कथ्यन्ते) भोगोपभोगपरिमाणव्रताचे हे पाच अतिचार सांगितले आहेत.

याप्रमाणे श्रीस्वामिसमंतभद्राचार्य - विरचित रत्नकरंड श्रावकाचाराच्या मूळ श्लोकांचे हिंदी भाषेतील वचनिकेच्या अनुवादातील हा तिसरा अधिकार संपला.

आता चार शिक्षाव्रताचे स्वरूप-निरूपण करण्याकरिता सूत्र सांगतात-

चार प्रकारचे शिक्षाव्रत

देशावकाशिकं वा सामयिकं प्रोषधोपवासो वा।

वैयावृत्यं शिक्षाव्रतानि चत्वारि शि,टानि।।९१।।

अन्वयार्थ - (देशावकाशिकं) देशावकाशिक, वा (सामयिकं) सामायिक आणि (प्रोषधोपवास:वा) आणि प्रोषधोपवास (वैयवृत्यं) ही (चत्वारि शिक्षाव्रतानि शिष्टानि) चार शिक्षाव्रते सांगितली आहेत.

भावर्थ - या व्रतापासून गृहस्थपणात राहून मुनिव्रताचे शिक्षण मिळते म्हणून यांना शिक्षाव्रत असे म्हटले आहे.

देशावकाशिक व्रताचे लक्षण

देवावकाशिकं स्यात्कलपरिच्छेदनेन देशस्य।

प्रत्यहमणुव्रतानां प्रतिसंहारो विशालस्य।।९२।।

अन्वयार्थ - (अणुव्रतानां) अणुव्रतामध्ये धारण केलेली (प्रत्यहं) दररोज (कालपरिच्छेदनेन) कालाची मर्यादा करून (विशालस्य देशस्य) विस्तीर्ण प्रदेशाची मर्यादा (प्रतिसंहार:) कमी करीत जाणे हे (देशावकाशिकं स्यात्) देशावकाशिक व्रत होय.

भावार्थ - दिग्व्रतामध्ये पूर्वी दहा दिशांना जाण्यायेण्याची व वस्तू नेण्या-आणण्याची जी मर्यादा यावज्जीवपर्यंतची केली होती, तीतून आता दररोज काही क्षेत्र, कालाची मर्यादा करून कमी करणे याला देशावकाशिकव्रत म्हणतात. जसे पूर्व दिशेला दिग्व्रतात दोनशे कोसाची मर्यादा यावज्जीव केली होती, त्यातून आता दररोज दहा-वीस, पाच-पंचवीस कोसाची मर्यादा करावी म्हणजे पूर्वी मर्यादा केलेल्या प्रदेशापेक्षा कमी प्रदेशात जाणे येणे वगैरे क्रियेकरिता त्या बाहेर जाणार नाही, असे जाणे येणे व व्यवहाराचे प्राण वरचेवर कमी कमी करीत जाणे याला देशावकाशिकव्रत म्हणावे.

देशावकाशिकव्रतातील क्षेत्राच्या मर्यादा

गृहहारिग्रामाणां क्षेत्रनदीदावयोजनानां च।

देशावकाशिकस्य स्मरन्ति सीम्नां तपोवृद्धा: ।। ९३ ।।

अन्वयार्थ इ (तपोवृद्धा:) तपोवृद्ध म्हणजे गणधरदेवांनी (गृहहारिग्रमाणां क्षेत्रनदी-दाव-योजनानां च) घर, कटक, गाव, क्षेत्र, नदी, वन आणि योजन अशा (देशावकाशिकस्य) देशावकाशिकव्रताच्या (सीम्नां स्मरन्ति) मर्यादा सांगितल्या आहेत. या हद्दीचे उल्लंघन करणार नाही असा नियम करावा.

देशावकाशिक व्रतात कालांची मर्यादा

संवत्सरमृतुरयनं मासचतुर्मासपक्षमृक्षं च।

देशावकाशिकस्य प्राहु: कालावधिं प्राज्ञा: ।। ९४ ।।

अन्वयार्थ - (देशावकाशिकेन) देशावकाशिक व्रत धारण करणाऱ्याने (सीमान्तानां परत:) ज्या मर्यादा केल्या असतील त्याच्या बाहेरील (सूक्ष्मेतरपंचपापसंत्यागात्) सूक्ष्म व स्थूल पाच पातकांचा पूर्णपणे त्याग झाल्यामुळे त्याची अणुव्रते दखील (महाव्रतानि प्रसाध्यन्ते) महाव्रतासारखी होतात.

देवावकाशिकाचे पाच अतिचार

प्रेषणशब्दानयनं रू पाभिव्यक्ति तपुद्‌गलक्षेपौ।

देशावकाशिकस्य व्यपदिश्यन्ते(त्यया: पञ्च।। ९६।।

अन्वयार्थ - (प्रेषणशब्दानयनं) आपण केलेल्या मर्यादेच्या बाहेर आपल्या काही प्रयोजनाकरिता आपल्या चाकरास मित्रास मुलाबाळास पाठविणे व त्यास (हेकाम करू न या(असे सांगणे याला प्रेषण नावाचा अतिचार म्हणतात. मर्यादेच्या बाहेर असलेल्या पुरुषाबरोबर वार्तालाप (संभाषण) करणे व त्याला शब्दांच्या खुणेने समजावून देणे यास शब्दातिचार म्हणतात मर्यादेच्या बाहेरील माणसास बोलावणे व वस्त्र-प्रावरणादि पदार्थ सांगून आणवून घेणे हा आनयनातिचार होय. (रू पाभिव्यक्ति त पुद्‌गलक्षेपौ) बाह्यक्षेत्रामध्ये उभा असलेल्या पुरुषाला खूण करण्याकरिता आपले रू प, हात दाखविणे हा रू पाभिव्यक्ति त अतिचार आहे आणि मर्यादेच्या बाहेरीलक्षेत्रात वस्त्र किंवा खडे, लाकूड वगैरे फेकून आपण येथे आहोत असे त्यास समजाविणे याला पुद्‌गलक्षेपातिचार म्हणतात. याप्रमाणे (देशावकाशिकस्य पंच अत्यया: व्यपदिश्यन्ते) देशावकाशिकव्रताचे हे पाच अतिचार सांगितले आहेत.

सामायिक व्रताचे स्वरू प

आसमयमुक्ति क्तमुक्तं पंचाघानामशेषभावेन।

सर्वत्र च सामयिका: सामयिक नाम शंसन्ति।। ९७।।

अन्वयार्थ - (सामयिका:) सामायिक म्हणजे परम शांतभावाला प्राप्त झालेल्या गणधर देवांनी सामायिक नाम व्रताची फार प्रशंसा केली आहे. त्यांनी (सर्वत्र) सर्वत्र म्हणजे मर्यादा केलेल्या व मर्यादा न केलेल्या अशा दोन्हीक्षेत्रात (अशेषभावेन) मनवचनकाय, कृत, कारित, अनुमोदना याही करू न (आसमयमुक्ति क्तमुक्तं) समय मर्यादा संपेपर्यंत (पंचाघानां) पंच पापांचा (त्याग:) त्याग करणे याला (सामयिकं नाम शंसन्ति) सामायिक असे नांव दिले आहे.

भावार्थ - समय, मर्यादा संपेपर्यंत संपूर्ण पापांचा काही वेळ त्याग करणे हे सामायिक होय.

सामायिकामधील आसन

भूर्द्धरुहमुष्टिवासोबन्धं पर्यङ्‌कबन्धनं चापि।

स्थानमुपवेशनं वा समयं जानन्ति समयज्ञा:।। ९८।।

अन्वयार्थ - (मूर्द्धरुहमुष्टिवासोबंध) सामायिक करणाऱ्याने आपले केश मोकले असल्याने बांधावे. हातावर हात ठेवून मुष्टिबंध करावा. वस्त्र मोकळे असल्यास त्याला गाठ घालावी. (पर्यङ्कबन्धनं न अपि) पद्मासन किंवा (स्थानं) उभे कायोत्सर्गासन घालावे. (उपवेशनं वा) सामान्यपणे पद्मासनच असावे. हे (समयं) सामायिकाचे चिहून आहे असे (समयज्ञा: जानन्ति) शास्त्राचे जाणकार म्हणतात.

भावार्थ - सामायिक करणाऱ्याने कालाची मर्यादा केली असेल तोपर्यंत पाच पातकांचा संपूर्णपणे त्याग करू न उबे राहावे अथवा पर्यंकासन घालून बसावे. पर्यंकासनात आपल्या डाव्या हातावर उजवा हात ठेवावा. आपल्या मस्तकावरील केश बांधावे वस्त्र विखरू नये म्हणून त्याला गाठ द्यावी. याला सामायिकाचा समय मर्यादाकाल म्हणतात.

सामायिकाला योग्य स्थान

एकान्ते सामयिकं निर्व्याक्षेपे वनेषु वास्तुषु च।

चैत्यालयेषु वापि च परिचेतव्यं प्रसन्नधिया।। ९९।।

अन्वयार्थ - (सामयिकं) सामायिक करणे ते (एकान्ते) एकांत ठिकाणी (निर्व्याक्षेपे) निरुपद्रव स्थळी, (वनेषु) वनात, (वास्तुषु च) घरात, (अपि च चैत्यलयेषु वा) देवळात किंवा इतर ठिकाणी अशाच (प्रसन्नधिया परिचेतव्यं) प्रसन्न मनाने करावे.

भावार्थ - ज्या जागी मनाला विक्षेप-चंचलता उत्पन्न करणारी सामग्री नसेल, पुष्कळसे असंयमी लोकांचे जाणे येणे नसेल, अनेक प्रकारचे लोक जमून वादविवाद करू न गडबड करीत नसतील, स्त्री, नपुंसक यांचे जाणे येणे नसेल, आजूबाजूला नाच-रंग, गामे-बजावणे होण्याचा संभव नसेल, पशुक्ष्यादिकांचा ज्या ठिकाणी उपद्रव नसेल, फार थंडी, कडक ऊन, सोसाट्याचा वारा व दुधार पाऊस होण्याचा संभव नसेल, डास, मच्छर, किडा, मुंगी, भुंगे, मधमाशा, सर्प, विंचू वगैरे प्राण्यापासून बाधा होण्याचा संभव नसेल, अशी ठिकाणे सामायिक करण्यास योग्य आहेत. ते एकांत स्थान असो, निर्जन वन असो, जुन्या बगीच्यातील बंगला असो, घर असो, देऊळ असो अथवा धर्मात्मा लोकांचे प्रोषधोपवास करण्याचे स्थान असो, त्या ठिकाणी चित्त प्रसन्न करू न सामायिक करावे.

सामायिकाची आणखी सामग्री

व्यापारवै मनस्याद्विनिवृत्यामन्तरात्मविनिवृत्या।

सामयिकं बध्नीयादुपवासे चैकभुक्ते वा।। १००।।

सामयिकं प्रतिदिवसं यथावदप्यनलसेन चेतव्यम्।

व्रतपंचकपरिपूरणकारणमवधानयुक्तेन।। १०१।।

अन्वयार्थ - (व्यापारवै मनस्यात विनिवृत्त्यां) शरीराची हालचाल आणि मनाची व्यग्रता बंद करून, (अन्तरात्मविनिवृत्या) अंत:करणाचे विकल्प सोडून, (उपवासे) उपवासाच्या दिवशी (वा) किंवा (एकभुक्त च) एकभुक्तीच्या दिवशी (सामायिकं) सामायिक (बध्नीयात्) धारण करावे. (अनलसेन) आळस सोडून (प्रतिदिवसं) दररोज वर सांगितल्याप्रमाणे (अवधानयुक्तेन) सावधान चित्ताने (सामयिकं) सामायिक (यथावत्) यथाविधि (परिचेतव्यं) वढ्ढवीत जावे. कारण ते (व्रत-पंचक परिपूरण करणं) पाच व्रतांना परिपूर्ण करण्यास कारण आहे.

विशेषार्थ - सामायिक करण्याविषयी उद्युक्त झालेल्या श्रावकांनी संपूर्ण आरंभादि पापक्रियांचा त्याग करून व मनाचे विकल्प सोडून सामायिक करावे. कोणी पर्वतिथीच्या निमित्ताने उपोषण करतात, कोणी एकभुक्तीच्या दिवशी करतात. कोणी प्रतिदिवशी करतात, अथवा पूर्वाण्ह, मध्यान्ह व अपराण्ह अशा तीन काली दोन घटकांची मर्यादा करून करतात.

सामायिक हे एकांत जागी निश्चल पर्यंकासनाने बसून अथवा कायोत्सर्गासन (उभे राहून) घालून, अंग उपांग चंचल होणार नाहीत अशा रीतीने काष्ठपाषाणाच्या अचल मूर्तीप्रमाणे निश्चल होऊन, दहा दिशाकडे न पाहता आपल्या अंगोपांगाकडे न पाहता, कोणाशीही न बोलता, संपूर्ण पंचेंद्रियांच्या विषयांपासून मन आवरून, सर्व चेतन अचेतन पदार्थावरील रागद्वेष हर्ष विषाद, वैर, स्नेह वगैरे सोडून करावे. त्यावेळी सर्व जीवांविषयी मैत्रीभाव ठेवावा व उत्तम क्षमा धारण करावी व मनात पुढील विचार आणावे.

((मी सर्व जीवांवर क्षमा धारण करतो. माझे जगातील कोणाही जीवाशी वैर नाही. मी उपार्जन केलेले कर्मच माझे वैरी असून मी अज्ञानाने क्रोध, लोभ, अभिमान धारण करून विनाकारण विपरीत विचार मानत आमले. ज्याने माझ्या अभिमनाला पुष्टी दिली नाही. ज्याने माझ्ी स्तुती केली नाही व माझ्या कर्तव्याची प्रशंसा केली नाही त्याला, माझा ज्यांनी आदरसत्कार करून उत्थापन करून योग्य स्थान दिले नाही, कोणी माझे दोष प्रकट केले त्ाला, कोणी माझ्या म्हणण्यप्रमाणे वागला नाही महणून त्यला, वस्त्र भोजनादिक व धनधान्यादिक सामग्री प्राप्त

होऊ दिली नाही, तयाला याप्रमाणे सर्वांना वैरी मनले ही सर्व मझ्य कषायापासून उत्पन्न झालल वैरबुध्दी आता सोडून मी क्षमा धारण करतो व त्या सर्व जीनांनीही अज्ञानामुळे कषयांच्या स्वाधीन झालेलो समजून मजवर क्षमा करावी. याप्रमाणे वैरिवरोधाची बुध्दी सोडून मी सर्वाविषयी साम्य धारण करू न सामायिकाचा अंगीकार करतो व जे दन घटिकंचे (२४ मिनिटांची १ घटका) प्रमाण केले आहे तेव्ढ्या वेळेत मनवचनकायेने सर्व पंचेद्रियांचे विषय व आरंभ यांचा त्याग करू न पंचपरमष्ठीचे ध्यान करीत राहातो((. यप्रमाणे सामायिकाच्य वेळी प्रतिज्ञा करू न पंचनमस्करांच्या अक्षरांचे ध्यान करीत, त्ांच्ा गुणांचे स्मरण करीत, जिनेश्वराच्या प्रतिबिंबाच चिंतन करीत रहावे आणि आपल्या ज्ञानदर्शन-स्वभावाहून राग, द्वेष भिन्न आहेत ्सा विचार करावा.

द्वादश अनुप्रेक्षा व षोडशकारण भावनांच चिंतन करावे. चार मगल पदे, चर उत्तम पदे, चार शरणपदांचे स्मरण करावे. चोवीस तीर्थकरांच स्तवन करावे, एकेका तीर्थकरांची स्तुती व पंचगुरू चे स्तवन यांच्या अर्थावर एकाग्रतेने विचर करावा, प्रतिक्रमण करीत असता सर्व दिवसभर घडलेल्या दोषांचे सायंकाली चिंतन करावे व रात्री घडलेल्या दोषांचे सकाळी चिंतन करावे. हा दुर्लभ नमुष्यजन्म व यात प्राप् झालेला परम वीतराग सर्वज्ञानी उपदेशिलेला हा धर्म अनंतकालात आपणास प्राप्त झाला. याबद्दल धन्यता मानून यातल एक पळ दखील धर्मचिंतनाशिवाय व्यर्थ न जावा असा सदैव मनात विचार करीत रहावे.

आज जिनदर्शन, स्तवन, ध्यान, धारणा, धर्मचिंतन, स्वाध्याय, पात्रदान वगैरे क्रियांत आपला कितीवेळ खर्च झाला व व्यापार, आरंभक्रिया, इंद्रियांच्या विषयपोषक-क्रिया व व्यावहारिक विकथा, प्रमाद, निद्रा, कामसेवन, भोजन, पान वगैरे क्रियेमध्ये किती काल गेला याचा आपल्ा मनाशी विचार करीत ्सावे.आपल्या मन-वचन-कार्यांची प्रवृत्ती रागादिक संसारकार्याकडे अधिक झाली किंवापरमार्थाकडे अधिक झाली हे पहावे. याप्रमाणे सर्व दिवसांच्या कर्तव्याचे सायंकाळी चिंतन करावे व रात्रौ घडलेल्या कार्याचे सकळी चिंतन करावे. कारण व्यवहारात नेहमी आपण असे पाहतो की, जो पाच रुपयाचे भांडवल घेऊन धंदा करतो तो पण दररोज संध्याकाळी आपणास नफा तोटा किती झाला हे पाहता असतो. ज्यांना पूर्वपुण्यईच्या प्रभावाने या जन्मी प्राप्त झालेला उततम धर्म, सत्संगति, मनुष्यजन्म इंद्रियपरिपूर्मता हेच कोणी एक धन यचा व्यवहार करणारे ज्ञानी पुरुष आपल्या आत्म्याची होणारी हानी किंवा वृध्दी कशी पाहणार नाहीत(जर तो आपला नफा तोटा पाहणार नाही तर परलोकाकूडन आणलेल्ा त्याचया धर्मधनाचा नाश होईल व तयल नरक तिर्यचादिक वा नरक निगोदादि दुर्गतीमध्य पडावे लागून

नष्ट व्हावे लागेल यकरिता धर्मधनाचया वृध्दीसाठी एका दिवसात दोन वेळी तरी निदन त्या धर्मधनाच्या संरक्षणाची काळजी घेतली पाहिजे.

कषायामुळे जी आपली मनवचनकायेची दुष्ट प्रवृत्ती झाली असेल त्याबद्दल वरचवर आपली निंदा करून घेतल पाहिजे. ती अशी ((अरेरे मी आज दुष्ट चिंतन केले, शरीराने दुष्ट क्रिया केली, वचनाने निंदय, बीभत्स शब्द उच्चारले. या योगाने अशुभ कर्माचा बंध झाला, धर्माला दूषण वालिले, अपकीर्ती करून घेतली. त्या कर्माची आठवण होण्याने मल फारच वाईट वाटत आहे. मझे हृदय पश्चात्तापाने जळत आहे. महकर्म बलवान आहे. आपलया दुष्ट परिणामाने, पाप उत्पन्न होते त्यामुळे दुर्गतीला जावे लागते, यपासन कोणतेही प्रयोजन सिध्द होत नाही. आयुष्य क्षणभंगुर आहे, मी केलेल कर्म मलाच भोगावे लागणार आहे, वगरे सर्व मी जाणतो, एवढ`च नव्हे पण रात्रंदिवस यांच्य दुष्परिणामांचे चिंतर करीत असून अजन माझ्य मनातून अन्य जीवाविषयी वैर व विषयावरील प्रेम नाहीसे होत नाही. हा जबरदस्त मोहाचा प्रभाव आहे. य मोहकर्माचा नाश करून विजयी झालेल्ा पंचपरमेष्टीचे मी स्वरण करतो. त्यायोगाने मोहकर्मपासून उत्पन्न झालेल राद्वेषादिक भाव व कामादि विकार, क्रोध, मन, माया, लोभादिक नाहीस होतील. ज्ाप्रमाणे जिनेंद्रदेवांनी वीतरागता प्राप्त करून घेतली आहे तशीच मलाही प्राप्त होवो. याच अभिप्रयाने मी शरीरावरील ममत्व सोडून पंचपरमेष्ठीचे ध्यान करीत आहे.((

अज्ञानामुळे पूर्वी ज्या भूमिच्छेदनादि क्रियांनी पृथ्वीकायघात केला असेल, अवगाहन, सिंचन, स्नान वगैरेनी जलकायिक जीवांची विराधना केली असेल, विझिवणे, कुटणे, वगैरे क्रियांनी अग्निकाय जीवांची हत्या केली असेल आणि पंखे वगैरे साधनांनी वायुकाय जीवांचा घात केला असेल, कंद, मूल, साल, पान, फूल, डहाळी, फाटे, गवत वेल, बेलफल, वगैरे तोडून अथवा झाडेझुडपे उपटून. शिजवून, वाटून वगैरेनी वनस्पतिकाय जीवांची विराधना केली असेल, त्यासर्व क्रियांपासून उत्पन्न झालेल्या पापकर्माचा नाश परमेष्ठीचया जाप्याच्या प्रभावापासून होऊ दे. त्या परमेष्ठीच्या ध्यानप्रभावाने माझे परिणाम षट्कायजीवांच्या घातापासून पराङ्मुख होऊन संयमभावाची प्राप्ती होऊ दे. अस चिंतन करावे यचप्रमाणे ((मझ्या जाण्यायेण्यादि क्रियंत, उठण्या-बसण्यात, संकोचिवस्तारादि क्रियेत, जेवणाखाण्यात, पदार्थ उचलण्यात, ठेवण्यात, चूल पेटिवणे, जमीन सारवणे, पाणी शिंपडणे वगैरे क्रियांत, सेवा, कृषि वाणिज्य, लेखन, शिल्प वगैरेंनी उपजीविका करण्यात, गाड, घोडा इत्यादिकंचे वाहन ठेवण्यात जमकडून यत्नाचाररहित प्रवृत्ती झाल्यमुळे द्विद्रिंय, त्रीद्रिय, चतुरिंद्रिय, पंचेद्रिय जीवंची विराधना झाली असेल ती मिथ्या होवो.((

आरंभादिक व्यवहारात अनेक प्रकारच्या पापक्रियांपासून कल्याण होत नाही, संसारामध्ये भ्रमण करावे लागते, नरक प्राप्त होतो. एकेन्द्रिय, तिर्यंच योनीमध्ये अनंतानंतकाल क्षुधा, तृषा, मारण, ताडन, बंधन, छेदन वगैरे अनेक दु:खे भोगाव लागतात. याकरिता या आरंभात घडणाऱ्या हिंसपासून उत्पन्न झालेल्या कर्माच नाश होण्याकरिता व पुढे आरंभी हिंसा न घडावी म्हणून मी आत पंच-नमस्कर पदांना शरण जातो.((

अज्ञानामुळे अथवा प्रमादामुळे मी असत्य वचन उच्छारिले, शिवी दिली, बीभत्स भाषण केले, मर्मच्छेदी शब्द बोललो, कर्खश व कठोर वचन उच्चारले, कोणाला चोरीचा, कोणाला व्भिचाराचा कलंक लावल, धर्मात्मा, ज्ञानी, तपस्वी, शीलवान पुरुषावर दोषारोप केला, त्ांची निंदा केली, देवगुरुधर्माची निंदा कली, मिथ्याधर्माचे पोषण केले, हिंसेची प्रवृत्ती व्हावी असा उपदेश केला, मिथ्याधर्माचा प्रसार व्हावा म्णून खटपट केली, स्त्रीकथा, राजकथा, भोजनकथा, देशकथा इत्यदि विकथा करून घोर पापाचय प्रतिपादनात आपली वाणी खर्च केली, त्या सर्वांबददल मी आता पश्चात्ताप करतो. मी घोर कर्माचा बंध केला. त्याच फल नरकाच दु:ख व पशुगतीतील घोर दु:ख अनंत काल भोगावे लागणार आहे व अनंतकालपावेतो बहिरा, मुका, आंधळा नीचकुलोत्पन्न होऊन दारिद्र भोगावे लागणार आहे. म्हणून आता तरी असत् व तुष्ट वचन बोलण्यापासून पापाच नाश करण्याकरिता व यापुढे अशी दुष्ट वचनप्रवृत्ती पुन: कधीही न व्हावी यासाठी पंचनमस्कर पदाला शरण गेलो आहे.

अज्ञानामुळे किंवा प्रमादामुळे पूर्वी मी दुसऱ्याचे न दिलेले, जमिनीवर पडलेले, विसरलेले द्रव्य घेण्याची इच्छा केली असेल, कपटाने कोणाला ठकविले असेल, जबरदस्तीने एखाद्याचे द्रव्य ठेवून ज्याचे त्याला दिले नसेल, ज्याचे द्रव् त्यास देण्याकरिता मी इतरास फार दु:ख दिले असेल अथवा स्वत: सोशिले असेल, यापासून घोर पापाचा बंध मला झाला. त्याचे फळ नरकतिर्यंचादिक गतीत अनंतकालपर्यंत भ्रमण व दारिद्राने पीडित होउन दु:ख भोगणे हे प्राप्त झााले आहे. याकरिता चोरी करण्यापासून प्राप्त झालेल्या क४माचा नाश व्हावा म्हणून व पुढे मला कोणी दिल्याशिवाय परधन घेण्याची इच्छा न व्हावी एतदर्थ पंचपरमेष्ठी पदांचे चिंतन करून त्याला शरण जातो.

परस्त्रीचे स्वरूप, वस्त्राभरण, अलंकारादिकाकडे रागभावाने पहण्याची इच्छा केल्याने व प्रत्यक्षा पाहिल्याने, तिच्याशी संग केल्याने जे भयंकर पाप उपार्जन केले त्याचे फल अनंतकाल नरकगतीमध्ये कामरूप अग्नीने दग्ध होणे, असंख्यात जन्मात कामवेदनेने पीडित होणे, दारिद्रादिक दु:ख भोगणे व अनेक प्रकारच्या रोगांनी शरीर व्यापलेले असणे, वगैरे दु:ख प्राप्त

होत आहे. याकरिता परस्त्रीच्या इच्छेपासन झालेल्ा पापकर्मांच्य नशार्थ व पुढे परस्त्रीची इच्छा न व्हावी म्हणून मी पंचपरमगुरू च्या-पदाचे ध्यान करतो.

मी महान अज्ञानी, माझी परिग्रहावर जबरदस्त ममता, मी शरीरादिक पुद्गलांना माझे असे मानून हेच माझे स्वरू प आहे असे जाणले, रागादिकभाव मोहकर्माच्ा उदयाने होणार असून ते माझेच ाहेत असे समजलो. परद्रव्यावर अतिशय आसक्त ती ठेवून धनधान्य, आभरण वस्त्रादि हजारो वस्तू यावरील मोह नाहीसा होत नाही. त्या परवस्तू समजूनही आपलयाच आहेत, अशी विपरीत बुध्दी नाहीशी झाली नाही. आत्मज्ञान,परज्ञान, पापपुण्याचे ज्ञान, परलोक ज्ञान हे नाहीसे झाले आहे, कंठी प्राण येऊन ठेपला तरी ममता कमी होत नाही. जगामध्य कोणीही परिग्रह आपल्या बरोबर नेला नाही व तो आपल्याबरोबर येणार नाही असे जाणूनही प्रति दिवशी तो वृध्दिंगत करण्याचे प्रयत्न चालू आहेत. मी मरेतोपर्यंत यत्किंचितही ते कमी न व्हावे अशी माझी तीव्र इच्छा आहे. या परिग्रहाची इच्छा आहे. अज्ञानपणाने यांच्या संग्रहासाठी याच्या तीव्र् इच्छा धारण करू न अनंतकालात दुर्लभ अशा मुष्यजन्मात जिनधर्म प्राप्त झाला असूनही तो आचरण करण्याचे मनात आणले नाही. तयमुळे नरकतिर्यचगतीचे दु:ख प्राप्त करू न घेतले. आता याबद्दल मला फार पश्चात्ताप होत आहे. या भयंकर पापाच नाश करण्याच उपाय फक्त त पंचपरमेष्टीच्या चरणकमलाला शरण जाण्याखेरीज कोणताही उरलेला नाही व पुढेही परिग्रहापासून विरक्त ती उत्पन्न करण्यच बुध्दी देणारा भगवानन पंचपरमेष्ठी शिवाय दुसरा कोणी समर्थ नाही. या सर्व कारणाकरिता व परिग्रहाचा त्याग करू न परमसंतोष प्राप्त व्हावा म्हणून पंचनमस्काराचे ध्यान करू न कायोत्स४ग करतो

सामायिक करणारा गृहस्थ कसा दिसतो

सामयिके सारम्भाः परिग्रहा नैवं सन्ति सर्वे(पि ।

चलोपसृष्टमुनिवरिव गृही तदा याति यतिभावम् ।। १०२ ।।

अन्वयार्थ - (सामायिके) गृहस्थाला सा्माकिाच्या वेळी (सर्वे अपि सारम्भाः परिग्रहाः) सर्व प्रकारेच आरेंभ व सर्व परिग्रह (नैव सन्ति) नसतात. (तदा) त्यावेळी (गृही चलोपसृष्टमुनिः इव) तो गृहस्थछ वस्त्र गुंडाळलेल्या मुनीसरखा (यतिभावं याति) यतिपणाल प्राप्त होतो. (म्हणजे मुनीपेक्षा वस्त्रच काय ते याला अधिक असते. बाकी परिणाम सारखे असतात.)

भावार्थ - सामायिकाच्या प्रसंगी गृहस्थाला संपूर्ण आरंभ व परिग३ह नसतात. पण तो गृहस्थ असल्ाने फक्त त वस्त्र अंगावर असते म्हणून वस्त्राशिवाय इतर बाबतीत तो मुनितुल्य

असतो. मुनीला नग्नपणा असतो, याने वस्त्र धारण केले आहे, एवढाच काय तो फरक. पण यामुळेच या गृहस्थाला साक्षात मुनी म्हणता येत नाही.

आता अशा स्थितीत उपसर्ग (परीषह) प्राप्त झाला असता मुनी प्रमामे धॅर्य धारण करावे, भिऊ नये अस सांगतात.

परिषह जय

अन्वयार्थ - (समायिकं प्रतिपन्ना) सामायिक धारण करणारे गृहस्थ (अचलयोगाः) मनवचनकायाचय यगांना सिथर करून (मौनधाराः) मौन धारण करतात. (शीतोष्णदंशमशकपरीषहं) थंडी, ऊन, डासमच्छारादिक प्राण्यापासून होणारा त्रास अथवा (उपसर्ग अपि च) कोणी उपसर्ग केल्यास (अधिकुर्वीरन्) तोही सहन करतात.

भावार्थ - कसलाही थंडी-वाऱ्याचा, उन्हा-पावसाचा त्रास झाला आणि वाघ, सिंह व शत्रूकडून उपसर्ग दिला गेला तरी तौ धैर्याने सहन करावा. घाबरू नये. साम्यभाव व मौन सोडू नये.

समायिक करीत असात संसाराच्या व मोक्षाच्या स्वरूपाचे चिंतन करावे ते असे -

संसार व मोक्षाचे स्वरूप

अशरणमशुभमनित्यं दुःखमनात्मानमावसामि भवम् ।

मोक्षस्तद्विपरीतात्मेति ध्यायन्तु सामयिके ।। १०४ ।।

अन्वयार्थ - (सामयिके) सामायिक करणार्यांनी सामायिकाच्या वेळी (अशरणं) कोणी येथे शरण (रक्षण करणारा) नाही (अशुभं) अशा पापरुपी, (अनित्यं) नाशवंत, (दुःखं) दुःखदायक, (अनात्मानं) आत्मस्वरुपरहित (भवं) संसारात (आवसामि) मी पडलो आहे आणि (मोक्षः) मोक्ष (तद्विपरीतत्मा) याच्या विरुध्द स्वरूपाचे आहे (ईति ध्यायन्तु) असा विचार करावा.

विशेषार्थ - सामायिक करताना असा विचार करावा की, हा चतुर्गति-भ्रमणरूपी संसार अशरण आहे. यात अनंतानंत जन्म-मरण करीत असता, अनंत काल निघून गेला. सर्व पर्यायात क्षुधा, तृषा, रोग, वियोग, ताडन, मारण भोगीत असता त्यतून मुक्त करणारा कोणीही भेटला नाही. यावरून संसार-दुःखापासून रक्षण करणारा कोणी नाही असा निश्चय करावा.

संसार जसा अशरण आहे तसाच अशुभही आहे. कारण अशुभ कर्माच्या बंधनाने दु:ख देणारा, अशुभ देहरू प पिंजऱ्यात अडकिवणारा, अशूभ कषायस्वरू पी अशुभभावात लीन होऊन निरंतर अशुभाचाच बंध करणारा व अशुभाचे फळ दु:ख बोगण्ास हा ससार कारण आहे म्हणून ससार अशुभ आहे.

संसारात अनंत काल परिभ्रमण केरीत असता कदाचित उच्च कुलात जन्म, उत्तमक्षेत्रात वास्तव्य, इंद्रियपरिपूर्णता, सुंदर रू प, प्रबल बुध्दी, जगात पूज्य पणा व मानमान्यता, राज्यसंपत्ती, धनसंपदा, सद्गुणी मित्रांचा सहवास, आज्ञाधारक पुत्र, मनोहर स्त्री, पांडित्यय, सौर्य, बल, आज्ञा, ऐश्वर्य, मनोवांछित भोग व निरोगी शरीर कर्मोदयाने जीवाला प्राप्त झाले तरी ते क्षणमात्रात विजेप्रमाणे, इंद्रधनुष्याप्रमामे अथवा इंद्रजालाप्रमाणए खात्रीने नाहीसे होणारे आहेत. ते पुन: अनंतानंत काल गेला तरी प३ाप्त होमार नाहीत म्हमून संसार अनित्य आहे हेही सत्य आहे.

सर्व काली कर्मबंधनामुळे देहरू पी पिंजऱ्यात अडकलेला जीव, अनंतानंत जन्म मरणादिकांनी युक्त होऊन अनंतकाल गेला तरी दु:खापासून मुक्त होत नाही म्हणून हा संसार दु:खरू प आहे.

संसार-परिभ्रमण हे आत्मस्त्रुप नव्हे. म्हणमून संसार अनात्मरू प आहे. याप्रमआणे सामायिक करणाऱ्या गृहस्थाने संसाराचे चिंतन करावे.

संसारात मिथ्याज्ञानाच्या प्रभावामुळे अनंतकालापासून मला फिरावे लागले. तयापासून मुक्त होणे हा मोक्ष होय. तो आत्म्याचे सदैव चिंतन करण्यापासून प्राप्त होणार आहे. तो ्प्राप्त झाल्यानंतर अनंतानंत काल गेला तरी पुन:संसारात येण्याचे कारण उरत नाही. मोक्ष शुभ ाहे, नित्य आहे, अनेंतानंतकाल टिकणारा म्हणजे शास्वत आहे. अनंतज्ञानादिस्वरू प व अनाकुलतारू प आहे, स्वस्वरुपात्मक आहे. परसवरुपाचा नाही असेही चिंतन करावे.

शांत परिणाम ठेवून दोन घटका जर दररोज सामायिक केले तर पूर्वबध्द कर्माची निर्जरा होते. या सामायिकताचे महात्म्य इंद्राला देखील वर्णिता यावयाचे नाही, याच्य प्रभावाने अभव्य जीव देखील स्वर्गातील अत्युच्च् ग्रैवेयकापर्य्‌त जाऊन उत्पन्न होतो. सामायिकासारखा दुसरा धर्म झाला नाही व होणारही नाही. म्हणून याचे अंगीकरण करण्यात आत्म्याचे हीत आहे. ज्याला समायिकाचा पाठ मुखोद्गत येत नसेल त्याने आपले मन एकाग्र करू न निश्चयने सर्व आरंभ

परिग्रहांचा त्याग कराव व फक्त पंचनमस्कार मत्राच निर्विकार मनाने ध्यान करीत जरी दोन घटका पूर्ण केल्या तरी त्याला देखील वर वर्णिल्येप्रमाणे फलप्राप्ती होणार आहे.

सामायिकाचे पाच अतिचार

वाक्कायमानसानां दु:प्रणिधानान्यनादरास्मरणे ।

सामायिकस्यातिगमा व्यज्यन्ते पञ्च भावेन ।। १०५ ।।

अन्वयार्थ - (वाक्कयमानसानां दु:प्रणिधानानि) सामायिक करीत असता संसारासंबंधी काही गोष्टी बोलण्याकडे उपयोगपूर्वक वचनप्रवृत्ती करणे हा वचनदु:प्रणिधानातिचार, ज्यायोगे संयम-भ्रष्ट होईल अशी शरीराची हालचाल करणे हा कायदु:प्रणिधानातिचार, मनामध्ये आर्थरौद्रध्यानाचा विचार आणणे हा मनोदु:प्रणिधानातिचार, (अनादरास्मरणे) सामायिक निरुत्साहाने अथवा निरादराने करणे हा अनादरातिचार आणि सामायिक करीत असता देववंदना वगैरेचे पाठ विसरू न जाणे अथवा कायोत्सर्ग करावयाचे विसरमे हा अस्मरणातिचार असे (पंच) पाच (सामयिकस्य भावेन) समायिक व्रताचे परमर्थाने (अतिगम:) अतिचार (दोष) (व्यज्यन्ते) सांगितले आहेत.

प्रोषधोपवास व्रताचे वर्णन

पर्वण्यदृष्टम्यांच ज्ञातव्य: प्रोषाधोपवासस्तु ।

चतुरभ्यवहार्याणां प्रत्याख्यानं सदेच्छाभि : ।। १०६ ।।

अन्वयार्थ - (इच्छाभि:) प्रोषधोपवास करण्याच्या इच्छेने (पर्वणि अष्टम्यांच) अष्टमी आणि चतुर्दशी या पर्वतिथीचय दिवशी (सदा चतुरभ्यवहार्याणां प्रत्याख्यानं) दिवसा व रात्री चार प्रकारच्या आहाराचा त्याग करणे (प्रोषधोपवास: तु ज्ञातव्य:) त्याला प्रषोदोप्रवास म्हणतात.

विशेषार्थ - एका महिन्यात दोन अष्टमी व दोन चतुर्दशी य चार वर्वतिथी अनादि कालापासून चालत आल्या आहेत. या पर्वतिथीत गृहस्थाने व्रत व संयम धारण करू न राहावे. धर्मात्मा व संयमी जे जीव आहेत ते सदाकाल व्रती असतातच. पण धर्मावर प्रीती करणाऱ्या गृहस्थाने एक महिन्यातून चार दिवस तरी सर्व पापारंभाचा त्याग करावा.इंद्रियांच्या विषयला दाबून ठेवावे. व्रतशीलसंयमासह उपवास धारण करावा व चार प्रकारच्या आहाराच्या त्याग करावा. याप्रमाणे वागणाऱ्याला प्रोषधोपवास व्रत घडते.

प्रोषधोपवास धारण करणाऱ्याने समप्तमीच्या त्रयोदशीच्या दिवशी मध्यान्हकाली एक वेळ भोजन पान करू न सर्व प्रकारच्या आरंभाचा त्याग करावा. अर्थात् व्यापार, देणे घेणे, सेवा-चाकरी कोणाची असेल तर ती देखील सोडून, शरीरावरील ममत्व कमी करू न, एकांत जागी ्थवा जिनमंदिरात, नीर्जि वनात, शून्यगृहात वा मठात जावे. त्याठिकाणी संपूर्ण विषय-काषायांचा त्याग करावा. मनचनकायेच्या प्रवृत्तीला रोकून धर्मध्यान करावे अथवा स्वाध्यय करीत सप्तमी वा त्रयोदशीचा अर्धा दिवस घालावा. पुन: संध्याकाळी देवनंदना सामायिकादि कार्य करू न रात्रौ धर्मकथा वन जिनेंद्र - स्तवन करीत करीत पूर्ण करावी. सर्व रात्र जागरण करणे शक्य नसल्यास शुध्द अशा बिछान्यावर (गादी पलंगावर नव्हे) थोडावेळ प्रमाद टाळण्याकरिता भगवंताचे नामस्मरण अंत:करणात करीत पहुडावे. अष्टमी चतुर्धशीच्या प्राप्त:कताली सामायिक वंदना करू न प्रासुक (शुध्द) अष्ट द्रव्यंनी जिनपूजन व स्वाध्यय करू न भावनांच चितन करीत करीत धर्मध्यनातच तो दिवस आणि रात्र पूर्ण करावी. नवमी आणि पौर्णिमेच्या प्राप्त:काली सर्व नित्यिनयम आटोपून पूजन, वंदन, स्तवन केल्यनंतर उत्तम, मध्यम, जघन्य यपैंकी जशा पात्राचा लाभ होऊल तशा पात्राला अन्नदान करू न, आपण पारणे करावे. याप्रमाणे सोळा प्रहर धर्मध्यानात जे गाळवितात, त्यांना उत्तम प्रोषधोपवास घडतो. यविषयी श्रीकार्तिकेय स्वामींनी महटले आहे की, अष्टमी चतुर्दशीच्या दिवशी स्नान, विलेपन, आभूषण, स्त्रीसंसर्ग, पुष्प, अत्तर, धूप, दीपादिकाच तयाग करू न जे ज्ञानी लोक वीतरागता हाच कोणी एक सुंदर अलंकार धारण करू न आपले शरीर शोभवितात, दोन्ही पर्वामध्य सदैव उपवास, एकाशन वा नीरस भोजन यापैकी काही शकती प्रमाणे करतात, त्यंना प्रोषधोपवास व३त घडते. श्री अमितगतिकृत श्रावकाचरामध्य पर्वतिथीच्या दिवशी उपवास, अनुपवास व एकभुक्त करावे असे तीन प्रकार संगिले आहेत. यतून चार प्रकरचया आहाराचा तयाग करणे याला उपवास म्हटल आहे. एक वेळ फक्त पाणी ग्रहण करणे याला अनुपवास आणि एक वेळी अन्न व पाणी ग्रहण करणे यला एकभुक्त अशी संज्ञा दिली आहे. याचे तात्पर्य एवढेच आहे की, आपली शक्ती न छपविता धर्मामध्य लीन हऊन उपवास करावा. पुढे चौथ्या प्रोषधप्रतिमेचे वर्णन करावयाचे आहे. तयवेळी षोडशप्रहराचा नियम आवश्यक ाहे. सध्या दुसऱ्य प्रतिमेत श्रावकाला यथाशक्ति व्रत, तप, संयम धारण करू न प४वतिथीत धर्मध्यनामध्य मन गुंतिवण्याच सवय केली तरी पुरे.

उपवासादिवशी कय सोडावे (

पंचनां पापानामलङ्क्रियारम्भगन्धपुष्पाणाम् ।

स्नानांजननस्यायनामुपवासे परिह्रतिं कुर्यत् ।। १०७ ।।

अन्वयार्थ - (उपवासे) उपवासाचय दिवशी (पंचानां पापानां) हिंसादिक पाच पापाचा तयाग करावा. (अलंक्रियारंभगंपुष्पाणां) अलंकार, वस्त्राभरणे, नटणे, सजमे, गृहकार्यारंभ, उपजीविकारंभ, सुगंधित-केशर कर्पूरादिकांची उटणी व अत्तर गुलाबांचा वास घेणे, (स्नान-अंजन-नस्यानां्) स्नान करणे, डोळ्यात सुरमा, काजळ घालणे, नस ओढ णे, वाद्ये वाचिवणे, गाणे ऐकणे, नाटक पाहणे, वगैरे (परिह्रतिं कुर्यात्) गोष्टींचा त्याग करावा. याचप्रमाइे इतरही पंचेद३यिांच्या भोगाचा त्याग करावा. कारण उपवास हा इंद्रियांची आसक्ति कमी करण्याकरिता व विषयकडे जाणाऱ्य प्रवृत्तीला रोकण्याकरिता, कामेच्छा कमी होण्याकरिता, प्रणाद, आळस, निद्रा न यावी महणून आरंभादिकापासून विरक्त होण्याकरिता, परीषह सहन करण्यास समर्थ होण्याकरिता, धर्म मार्गपासून न ढळण्याकरिता, जिवहेन्द्रिय व उपस्थ इंद्रियाला दाबून टाकण्याकरिता करावा लागतो. उपवासपासून आपली प्रशंसा व्हीवी, काही लाभ व्हावा, परलोकी राज्यसंपदादिक ्रपात् व्हावी हा उपवास करण्याचा हेतू नव्हे. केवळ विषयानुरग कमी व्हावा हाच फक्त हेतू असावा. उपोषणापासून खाणे-पिणे व अनेक प्रकारेच रसास्वाद घेणे यामधील तीव्र इच्छा कमी होते, झोप कमी होते, कामवेदना नाहीशी होते, असा याचा अतुल प्रभाव जाणून तो करण्याविषयी प्रवृत्त व्हावे.

उपवासाचा दिवस कसा घालवावा

धर्मामृतं सतृष्म: श्रवणाभ्यां पिबतु पायनेद्वान्यन् ।

ज्ञानध्यानपरो वा भवतूपवसन्नतन्द्रालु: ।। १०८ ।।

अन्वयार्थ - (उपवसन्) उपोषण करणाऱ्याने त्यादिवशी (सतृष्ण:श्रवणाभ्यां) अभिलाषेपूर्वक आपल्या कानानी (धर्मामृतं) धर्मरूपी अमृत (पिबतु) श्रवण करावे व (वा अन्यान् पाययेत्) दुसऱ्यास श्रवण करवावे. (अतंद्रालु:) झोप आणि आळस सोडून (ज्ञानध्यानपर: भवतु) ज्ञान-प्राप्तीमध्ये व ध्यान करण्यामध्ये तत्पर असावे.

भावार्थ - उपोषण केले असेल त्यादिवशी धर्मकथा श्रवण करावी. इतर धर्मवान जीवांना ती ऐकवावी. ज्ञानाभ्यास करीत धर्मध्यनात लीन होऊन तो सर्व दिवस घालवावा. आळसात, निद्रेमध्य अथवा आरंभादिकामधे व विकथा करण्यात घालवू नये.

उपवासाचा अर्थ

चतुराहारविसर्जनमुपवास: प्रोषध: सकृद्भुक्ति त: ।

स प्रषधोपवासो यदुपोष्यरम्भमाचरति ।। १०९ ।।

अन्वयार्थ - (चतुराहारविसर्जनं) खाणे, पिणे, स्वाद घेणे आणि चाटणे या चार प्रकारच्या आहारांचा त्याग करणे याला उपवास म्हणतात. (सकृत् भुक्ति त:) उपवासाच्या आदल्यादिवशी व उपवासाच्या दुसऱ्या दिवशी एक वेळ भोजन करणे याला (प्रोषध:) प्रोषध म्हणतात. याप्रमाणे सोळा प्रहर (उपोष्य आरंभं आचरति) उपवासपूर्वक एकभुक्ति त आरंभाचा स्वीकार करणे (स: प्रोषधोपवास:) यास प्रषधोपवास म्हणतात.

उपवासाचे पाच अतिचार

ग्रहणविसर्गास्तरणान्यदृष्टमृष्टान्यनादरास्मरणे ।

यत्प्रोषधोपवासे-व्यतिलङ्घनपञ्चकं तदिदम् ।। ११० ।।

अन्वयार्थ - (यत् अद्दष्टमृष्टानि ग्रहण-विसर्ग-आस्तरणानि) ड़ोळ्यांनी पहिल्या शिवाय, कोमल उपकरणांनी शोधिल्याशिवाय, पूजेची व स्वाध्यायची उपकरणे ग्रहण करणे हा ग्रहणाचतचार होय. न पाहता, न शोधता उपकरणे ठेवणे अथवा शरीराचे हातपायादि अवयव पसरणे हा विसर्गातिचार होय. न पाहता, न शोधता शयन करण्याचे उपकरणे म्हणजे बिछाना टाकणे हा आस्तरणातिचार, असे तीन (अनादर-अस्मरणे) व उपवासाविषयी अनादर करमे व आवश्यक क३यिमध्ये उत्साह नसणे हा अनादारातिचार, आणि उपवासाच्या दिवशी पाठक्रिया विसरू न जाणे हा अस्मरणातिचार (तत् इदं प्रोषधोपवासे-व्यतिलंघनपंचकं) प्रोषधोपवासव्रताचे अस पाच अतिचार आहेत. यांचा तयाग करू न व्रत शुध्द करावे.

वैयावृत्य अथवा अतिथिसंविभाग शिक्षाव्रत

दानं वयावृत्यं धर्माय तपोधनाय गुणनिधये ।

अनपेक्षितोपचारोपक्रियमगृहाय विभवेन ।। १११ ।।

अन्वयार्थ - (गुणनिधये अगृहाय तपोधनाय) रत्नत्रय-धारी, गृहविरंत तपश्वी अशा मुनीला (अनपेक्षितोपचारोपक्रियं) कोणताही मोबदला किंवा मंत्रतंत्रादिकांचा प्रत्युपकार मिळण्याची इच्छा न ठेवता (विभवेन) आपल्या वैभवशक्तीस अनुसरू न (धर्माय) धर्मपालनासाठी (दानं वैयावृत्यं) शुध्द आहार देणे याला वैयावृत्य म्हणतात.

विशेषार्थ - या ठिकाणी दानाला वैयावृत्य म्हटले आहे. ज्याचे तप हेच धन आहे अर्थात् इच्छा-नोरोधादिक तपालाच ज्यांनी आपले अविनाशी धन मानले आहे(तपाशिवाय दुसरे कर्ममल नाहीस करणारे साधन नाही, याशिवाय अविनाशी मोक्ष प्राप्त होत नाही म्हणून रागादि कषायरू प मलाच नाश करणारे तपरू पी धन ग्रहण करू न संसारात बुडिवणाऱ्या इतर जड, ्चेतन, विनाशिक, अशा सुवर्णादिधनांचा ज्यानी त्याग केला आहे असे तपोनिधी जे परम वीतरागी दिगंबर अती, त्यंनी दाता (दान देणारा) आणि पात्र (दान घेणारा) य दोहोंच्य धर्मप्रवृत्तीकरिता म्हणून दान देणे हेच वीतरागी यतीचे वैयावृत्य आहे.

दिगंबर यती हे सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्रादि अनेक गुणांचे निधान आहेत. त्यांना अंतर्बाह्य परिग्रह मुळीच नसता. त्यांना राहण्यास मठ, घर, आश्रम, वैगेर काहीही नसते. ते एकटेच कधी गुरुचरणापाशी, कधी वनात, कधी पर्वतावरील गुहेत, कधी भयंकर अरण्यात, कधी नदीच्य काठी, असे अनियमित फिरत असतात ते असंयमी गृहस्थांचा सहवास करू इच्छीत नाहीत. ते आत्म्याची विशुध्दता